
तेव्हा जमेल तेवढं स्वतःला व्यक्त करतो. त्याला इंग्रजी येत नाही. ते त्याला सुधारायचंय. पण आपण पदवीधारक होणार याबद्दल मात्र त्याच्या मनात तिळमात्र शंका नाही. 'मला शिकायचंय आणि मी शिकणार' तो ताकदीने बोलतो. त्याच्यासारखीच रात्रशाळेत इयत्ता आठवीत शिकणारी इंदू भवाळ. घरकाम करते. एका घरातील बाईंनी तिला शिकण्याचे प्रोत्साहन दिले. ती बहुदा अशाच प्रोत्साहनाची वाट बघत असावी. ते मिळाल्यावर मग २१व्या वर्षी सुद्धा आठवीपासून आपले शिक्षण पूर्ण करायला तिने मागेपुढे पाहिले नाही. महिन्याची २५०० रुपये कमाई तिच्या शिक्षणात अडथळा ठरू शकत नाही. रात्री शाळेत तिला झोप येत नाही, तर शिक्षक खूप चांगले आहेत. आम्हाला समजेल अशा प्रकारे शिकवतात, असे सांगून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. आता ती आठवीत आहे. तरीही भविष्यात नर्सिंगचा कोर्स करण्याचं ध्येय तिच्या डोळ्यासमोर आहे. मला माझ्या पायांवर उभं रहायचंय, ती ठामपणे सांगते. या दोघांसारखेच इतर अनेक होतकरू विद्यार्थी आहेत. ते त्यांचे प्रयत्न प्रामाणिकपणे करत आहेत, गरज आहे ती भक्कम आधाराची.



रात्रशाळांना खरेतर शंभर वर्षांचा इतिहास आहे. पण तेव्हाच्या समस्या व आताची परिस्थिती यात काहीही फरक पडलेला नाही. या शाळांना स्वतःची अशी जागा नाही. खडू, डस्टर या त्याच वस्तू हे विद्यार्थी वापरतात. प्रयोगशाळा नाही. गणवेश नाही. 'डे स्कूल'च्या सोयी-सुविधांवर या विद्यार्थ्यांचे शिक्षण चालते. त्यामुळे अनेक ठिकाणी त्यांच्यात आपण कोणावर तरी अवलंबून आहोत ही भावना निर्माण होते.

रात्रशाळांना खरेतर शंभर वर्षांचा इतिहास आहे. पण तेव्हाच्या समस्या व आताची परिस्थिती यात काहीही फरक पडलेला नाही. या शाळांना स्वतःची अशी जागा नाही. खडू, डस्टर या त्याच वस्तू हे विद्यार्थी वापरतात. प्रयोगशाळा नाही. गणवेश नाही. 'डे स्कूल'च्या सोयी-सुविधांवर या विद्यार्थ्यांचे शिक्षण चालते. त्यामुळे अनेक ठिकाणी त्यांच्यात आपण कोणावर तरी अवलंबून आहोत ही भावना निर्माण होते. तर ज्या शाळांमध्ये असे वर्ग भरविले जातात त्यांच्यात उपकाराची भावना निर्माण होते. अशा उपकारांच्या ओझ्याखाली दबून या शाळा चालविल्या जातात.

शंभर वर्षांपूर्वी हीच स्थिती होती, आजही तेच आहे. ज्याप्रमाणे विद्यार्थी अहोरात्र राबत आहेत तिच गत शिक्षकांची. जे शिक्षक दुपारच्या शाळेत शिकवतात, तेच पुन्हा रात्री विद्यार्थ्यांना शिकवतात. या कामाचा त्यांना मोबदला मिळतो, ही गोष्ट खरी असली तरी त्याचा ताण त्यांच्यावर आल्याशिवाय राहत नाही.

अनेक स्तरांवर अनेक मंडळी ही परिस्थिती सुधारावी म्हणून प्रयत्नशील आहेत. पण समस्येचा आवाका एवढा आहे, की त्यांचे प्रयत्न पुरे पडत नाही. 'मासूम' ही अशीच एक संस्था. निकिता केतकर या माजी सनदी अधिकाऱ्याने स्थापन केलेली. निकिता या केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा पास होऊन संरक्षण खात्यात चांगल्या पदावर होत्या. पण तिथली नोकरशाही आणि टेबलजॉब यांना कंटाळून त्यांनी राजीनामा दिला. एका शैक्षणिक प्रकल्पावर संशोधन करत असताना रात्रशाळांशी त्यांचा संबंध आला. रात्रशाळा कोणत्या परिस्थितीत काम करत आहेत हे जवळून पाहिल्यावर त्यांच्यातील संवेदनशीलतेला मोहरायला मार्ग मिळाला. आपल्याकडे प्राथमिक शिक्षणाला पाठबळ देण्याच्या दृष्टीने अनेक योजना आहेत. सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन यासारख्या योजना प्राथमिक शाळेत शिकायला येणाऱ्या गरीब थरातील लहानग्यांसाठी आखण्यात आल्या आहेत. पण त्याचवेळी माध्यमिक शिक्षणाकडे मात्र आपले दुर्लक्ष झाले असल्याचे त्यांना जाणवले व त्यातूनच 'मासूम' आकाराला आली. शाळेला लागणाऱ्या मूलभूत सुविधांसोबतच नोकरी करून येणाऱ्या मुलांना चांगल्या दर्जाचे अन्न देण्याची सोय मासूमने सुरू केली. त्याचबरोबर इंग्लीश स्पीकिंग कोर्सेही राबविण्यात येतात. प्रयोगशाळांची अनुपलब्धता हा विद्यार्थ्यांच्या मार्गातला एक प्रमुख अडथळा आहे. वर्षभर त्यांना प्रयोगशाळेत प्रवेशच मिळत नाही. परिक्षेच्या तोंडावर म्हणजे वर्षाच्या शेवटी एकदाच हे विद्यार्थी प्रयोगशाळांना भेट देतात. त्यामुळे या प्रयोगशाळा त्यांना वापरता याव्यात यासाठी 'मासूम'तर्फे मुख्यत्वे प्रयत्न केले जात आहेत. पुढच्या महिन्यात सायन्स कीटही संस्थेतर्फे देण्यात येणार आहे. सरकारतर्फे त्यांना अन्न मिळवे यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत. पाच शाळांना पुस्तके दिली आहेत. 'मासूम'च्या या कार्यात त्यांना अनलिमिटेड इंडिया, एडलगीव्ह फाऊंडेशन या भारतीय संस्था